**<u>ठळक बातम्या</u>**

- विधी विद्यापीठातून केवळ कायद्याची अक्षर ओळख करून घेण्याऐवजी कायद्यामागची भूमिका, आणि अंमलबजावणी समजून घेणं आवश्यक असतं, असं सरन्यायाधीशांचं प्रतिपादन

- कोकणाचा कॅलिफोर्निया नाही, तर कॅलिफोर्नियाला कोकणासारखं व्हावंसं वाटलं पाहिजे, असं काम करण्याचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा निर्धार

- बळजबरीनं केलं जाणारं धर्मांतर आणि लव्ह जिहाद विषयी नव्या कायद्यासंदर्भात अभ्यास करण्यासाठी सात सदस्यीय समितीची स्थापना

- आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेसाठी भारतीय क्रिकेट संघ आज दुबईला रवाना

**आणि**

- प्रसिद्ध पर्यटन व्यवसायिक केसरी पाटील यांच्या निधनानं सर्वत्र हळहळ

**<><><><><><>**

विधी विद्यापीठातून केवळ कायद्याची अक्षर ओळख करून घेण्याऐवजी कायद्यामागची भूमिका, इतिहास, कायद्याचा व्यावहारिक उपयोग आणि अंमलबजावणी समजून घेणं आवश्यक असतं, असं प्रतिपादन सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी आज केलं. नागपूरजवळ वारंगा इथं महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ-नागपूर, चा तिसरा दीक्षांत समारंभ आज झाला, त्यावेळी प्रमुख पाहुणे या नात्याने ते बोलत होते. या पदवीदान समारंभात, एकूण १५५ पदव्या प्रदान करण्यात आल्या. त्यात ११२ जणांना पदवी, २८ जणांना पदव्युत्तर पदवी तर १५ जणांना डॉक्टरेट पदवी देण्यात आली.

**<><><><><><>**

'खरी शिवसेना कोणती ते राज्यातल्या जनतेने विधानसभा निवडणुकीत दाखवून दिलं,' असं प्रतिपादन शिवसेनेचे नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज रत्नागिरीत केलं. विधानसभा निवडणुकीतल्या यशाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी रत्नागिरीत आयोजित आभार सभेत ते बोलत होते. अधिक माहिती आमच्या वार्ताहराकडून

… **व्हॉईस कास्ट- अनिकेत कोनकर ( २१ सेकंद)**

या वेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातल्या अनेक नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला, अशी माहिती आमच्या बातमीदारानं दिली आहे.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या भारत टेक्स २०२५ या वस्त्रोद्योग मेळाव्याला संबोधित करणार आहेत. नवी दिल्लीत आय़ोजित या मेळाव्याचा समारोप उद्या होणार असून त्यात १२० देशातून आलेले प्रतिनिधी सहभागी होत आहेत.

**<><><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत नुकत्याच केलेल्या भाषणात भारतीय अर्थव्यवस्थेचं सुस्पष्ट चित्र सादर केलं आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. समाज माध्यमावरच्या एका पोस्टमध्ये प्रधानमंत्र्यांनी सीतारामन यांचं केंद्रीय अर्थसंकल्पावरचं भाषण आणि प्राप्तिकर विधेयकाबद्दल लिहिलं आहे.

**<><><><><><>**

महाराष्ट्रात न्यायालयीन कामकाजासाठी आवश्यक पायाभूत सेवा सुविधांबद्दल न्यायमूर्ती अभय ओक यांनी असमाधान व्यक्त केलं आहे. ते आज मुंबईत आयोजित व्याख्यानमालेत बोलत होते. गेल्या पाच वर्षात हे चित्र बदलू लागलं आहे असं ते म्हणाले. फौजदारी न्याय व्यवस्थेला खिळखिळे करणारे घटक समाजात मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात आहेत तसंच सर्वसामान्यांना या व्यवस्थेकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण झालेल्या नाहीत, असं मत त्यांनी व्यक्त केलं.

<><><><><>

सागर परिक्रमा २ मोहिमेच्या तिसऱ्या टप्प्यात आय एन एस व्ही तारिणी नौकेमधून केप हॉर्न ओलांडत भारतीय नौदलाचे लेफ्टनंट कमांडर दिलना के आणि लेफ्टनंट कमांडर रूपा ए यांनी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. केप हॉर्न हे दक्षिण अमेरिकेचं दक्षिणेकडचं टोक आहे. नौकापटूंना दक्षिणी सागराच्या या भागात नेहमी आव्हानात्मक परिस्थितीचा सामना करावा लागतो. केप हॉर्न ओलांडण्याच्या या कामगिरीमुळे नौदलाच्या या दोन अधिकाऱ्यांना 'केप हॉर्नर्स' हा नौकापटूंसाठीचा बहुमान प्राप्त झाला आहे. केप हॉर्न हे ठिकाण अंटार्क्टिका पासून ४३२ सागरी मैल एवढ्या अंतरावर आहे.

<><><><><>

सामाजिक न्याय, सत्य आणि नीतिमत्ता यांचं अधिष्ठान असलेले गोर-बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत श्री सेवालाल महाराज यांच्या जयंती निमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज त्यांच्या समाधीस्थळाचं दर्शन घेत त्यांना अभिवादन केलं. श्री सेवालाल महाराज यांचे सुविचार न्यायप्रिय, सौहार्दपूर्ण आणि मानवतेच्या दृष्टिकोनातून समाजाला सदैव मार्गदर्शन करत राहतील, असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

श्री सेवालाल महाराज यांची जयंती आज **वाशिम** जिल्हाधिकारी कार्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली. वाशिममध्ये मानोरा इथं पोहरादेवी या सेवालाल महाराज यांच्या समाधीस्थळी पालखी सोहळा, शोभा यात्रेसह अनेक कार्यक्रमांचं आयोजन केलं होत. **हिंगोली** शहरात खटकाळी बायपास इथं आज सकाळी **यानिमित्तानं** स्वास्थ्य शिबिराचं आयोजन केलं होतं. **यवतमाळच्या** बोरगाव दाभडी इथं बंजारा तांड्यांवरही उत्साहाचं वातावरण होतं. बंजारा समाजानं पारंपरिक लोकनृत्य आणि वाद्यासह मिरवणुकीत सहभाग घेतला.

**<><><><><><>**

बळजबरीनं केलं जाणारं धर्मांतर आणि लव्ह जिहाद विरोधातल्या नव्या कायद्यासंदर्भात अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारनं सात सदस्यीय समिती स्थापन केली आहे. राज्याच्या पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखालील या समितीत महिला आणि बालकल्याण विभाग, अल्पसंख्याक व्यवहार विभाग, विधी आणि न्याय विभाग, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग या विभागांचे सचिव तसंच गृह विभागाच्या उपसचिवांचा समावेश आहे. बळजबरीनं केलं जाणारं धर्मांतर आणि लव्ह जिहाद विषयी राज्यातल्या सद्यस्थितीचा अभ्यास ही समिती करेल, आणि यासंदर्भातल्या तक्रारींवरील कार्यवाहीसाठीच्या उपाययोजना सुचवणार आहे. यासोबतच ही समिती या मुद्यांशी संबंधीत इतर राज्यांमधल्या कायदेशीर तरतुदी आणि कायदेही तपासून पाहणार आहे. या संदर्भात राज्य सरकारनं शुक्रवारी रात्री उशिरा अधिसूचना जारी केली होती.

**<><><><><><>**

४४व्या मराठवाडा साहित्य संमेलनाला आजपासून प्रारंभ झाला. छत्रपती संभाजीनगर जवळ वाळूज इथल्या दगडोजीराव देशमुख महाविद्यालयात उभारलेल्या विलासराव देशमुख साहित्य नगरीतून निघालेल्या ग्रंथदिंडीने

संमेलनाला प्रारंभ झाला. मसिआचे अधक्ष चेतन राऊत यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना अभिवादन करून ग्रंथदिंडीचे उद्घाटन करण्यात आलं. या ग्रंथदिंडीत लेझीम पथक, लाठी काठी पथक, भजनी मंडळ सहभागी झालं होतं. लाठी काठी फिरवण्याचं प्रात्यक्षिक तसंच भारूड आणि देशभक्तीपर गीतं सादर करून या कलाकारांनी नागरिकांचं लक्ष वेधून घेतलं.

<><><><><><>

'केसरी टूर्स' च्या माध्यमातून पर्यटकांना जगभर पोहोचवणारे केसरी पाटील यांचं आज सकाळी मुंबईत वार्धक्यानं निधन झालं. ते ९० वर्षांचे होते. संध्याकाळी त्यांच्या पार्थिवावर शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

पर्यटन व्यवसायातले रोजगार आणि व्यवसाय तसंच व्यवस्थापन संधीची माहिती देऊन अनेकांना या क्षेत्रात येण्याची प्रेरणा देण्यात ते मार्गदर्शकाची भूमिका बजावत असत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी केसरी पाटील यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. पर्यटन क्षेत्रातल्या संधीची ओळख करून देणारे आणि महाराष्ट्राचं नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेणारे उद्यमी म्हणून केसरी पाटील यांचं नाव सदैव स्मरणात राहील, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आदरांजली वाहिली आहे. तर केसरी पाटील यांच्या निधनामुळे महाराष्ट्राच्या पर्यटनक्षेत्राचा दीपस्तंभ अस्तंगत झाला असल्याची भावना एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केल्या आहेत.

<><><><><><>

सांगली जिल्ह्यात मिरजेच्या सरकारी रुग्णालयात आज जीबीएसच्या दोन रुग्णांचा मृत्यू झाला. मृतांमधे १४ वर्षांच्या एका मुलाचा समावेश आहे. कर्नाटकातल्या हुक्केरीहून हा मुलगा रुग्णालयात आला होता. मिरज रुग्णालयाच्या

अधिष्ठात्यांनी ही माहिती दिली. या आजाराला घाबरु नये, असं आवाहन त्यांनी केलं. राज्यात आतापर्यंत या आजाराने ११ रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

<><><><><>

महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना देशभरातील ऊर्जा कंपन्यांमधून सर्वोत्कृष्ट अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक म्हणून गौरवण्यात आलं आहे. गव्हर्नन्स नाऊ या प्रतिष्ठित नियतकालिकाच्यावतीनं काल मुंबईत घेतलेल्या 'वेस्टेक सिम्पोसियम अँड ॲवॉर्ड २०२५' सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

<><><><><>

स्मार्ट गव्हर्नन्स क्षेत्रातल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल आज नवी मुंबई महानगरपालिकेला 'स्मार्ट गव्हर्नन्स पुरस्कार' प्रदान करून गौरवण्यात आलं. नागरी प्रशासनातला डिजीटल माध्यमांचा प्रभावी वापर, सार्वजनिक सेवा वितरणाच्या कार्यक्षमतेतली वाढ, कामकाजातली पारदर्शकता आणि नागरिकांना झालेला प्रत्यक्ष लाभ अशा विविध उपक्रमांसाठी हा पुरस्कार  मिळाल्याची माहिती महापालिकेनं दिली.

<><><><><>

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सुरु असलेल्या बांधकामांसाठी पुनर्प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर करण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ कैलास शिंदे यांनी दिले आहेत. या विकास कामांकरता बहुतांश  पिण्यायोग्य पाण्याचा वापर केला जात असल्यानं पिण्याच्या पाण्याची बचत व्हावी हा यामागचा उद्देश आहे.

<><><><><>

आयसीसीच्या एकदिवसीय क्रिकेट चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेसाठी रोहित शर्माच्या नेतृत्वातला भारतीय क्रिकेट संघ आज दुबईला रवाना झाला.

या स्पर्धेत भारताचा समावेश अ गटात असून, २० फेब्रुवारीला भारताचा सलामीचा सामना बांगलादेश विरोधात होणार आहे. त्यानंतर २३ फेब्रुवारीला पाकिस्तानविरुद्ध आणि २ मार्चला न्यूझीलंडविरोधात भारताची लढत होणार आहे.

स्पर्धेच्या विजेतेपदासाठी अंतिम लढत ९ मार्चला होणार आहे. भारतानं याआधी दोन वेळा या स्पर्धेचं विजेतपद आणि दोन वेळा उपविजेतेपद पटकावलं आहे.

<><><><><>

क्रीडा स्पर्धेतून जिल्हा परिषदेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे ताण तणाव कमी होतील तसंच कलागुणांमध्ये वाढ होण्यासाठी मदत मिळेल, असं प्रतिपादन कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केलं आहे. पोलीस क्रीडांगण इथं जिल्हा परिषदेच्या वतीनं  आयोजित केलेल्या ‘जिल्हा परिषद अधिकारी-कर्मचारी’ यांच्या क्रीडा स्पर्धेचं उद्घाटन आबिटकर यांच्या हस्ते आज झालं त्यावेळी ते बोलत होते.

<><><><><>

राज्यात, कोकणात तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ तर विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित घट झाली आहे. राज्यात सर्वात कमी किमान तापमान अहिल्यानगर इथं १० पूर्णांक ५ अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं.

येत्या दोन दिवसात राज्यात हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//